# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. १४० /२०२२ मधील नि.क्र. १७ वरील आदेश

## (दत्तात्रय रायगोंडा पाटील विरुध्द सदाशिव गणपती माने पाटील वगैरे )

## (CNR NO. MHSN08000901-2022)

१. सदरचा अर्ज वादींनी प्रतिवादी क्र १ ते ७ यांचे विरुध्द 'जैसे थे' परिस्थीती ठेवण्याचा आदेश मिळविणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीच्या अर्जातील कथनाप्रमाणे, प्रतिवादी यांना दिनांक १५.६.२०२२ रोजी समन्स काढण्यात आले होते परंतु त्यांची बजावणी प्रतिवादी यांनी करुन घेतलेली दिसत नाही. प्रतिवादी क्र. १ ते ७ यांना समन्सची बजावणी करणेस बेलीफ गेले असता, प्रतिवादी हे बेलीफ यांना पाहून घरास कुलूप लावून गेले आहेत. त्यामुळे तसा अहवाल न्यायालयात दाखल केला आहे. त्यामुळे सदरील प्रतिवादी हे जाणुनबुजून या वादींना त्रास देण्याच्या उद्देशाने व सदर मिळकतीत बळजबरीने रस्ता करण्याच्या उद्देशाने सदरील कृत्य करीत आहेत व वादीच्या घरातील लोकांना दमदाटी, मारहाण करीत आहेत. तरी सदरील प्र. वादी क्र. १ ते ७ विरुध्द 'जैसे थे' परिस्थीती ठेवण्याचा आदेश करणे गरजेचे आहे. सदर प्रकरणी प्रतिवादीं विरुध्द रजिष्टर पोष्टाने समन्स काढण्याचा अर्ज दिला असून तोपर्यंतच्या कालावधीत 'जैसे थे' परिस्थीती ठेवण्याचा आदेश करावा अशी विनंती केली आहे.

३. वादीतर्फे वकील श्री. आर.डी. कदम यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादींच्या दाव्यातील दावा कलम ५ मधील कथने पाहता असे दिसून येते की, दावा मिळतीतून अतिक्रमण करुन तसा रस्ता कोणत्याही अभिलेख कार्यालयातील नकाशावरती नसताना प्र. वादी क्र. १ ते ७ हे स्वतःच्या मर्जीने निर्माण करु लागले आहेत. त्यामुळे वादी यांना या प्रतिवादी क्र. १ ते ७ यांनी वादींच्या दावा मिळकतीमध्ये निर्माण केलेला रस्ता हा बेकायदेशीर आहे, तो काढून घेणेबाबत व दावा मिळकत ही पूर्ववत करुन देणेबाबत हुकूमी ताकिद या प्र. वादी क्र. १ ते ७ यांचे विरुध्द

देणेकरीता. तसेच वादींच्या दावा मिळकतीच्या वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये, करवू नये व रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करु नये अशी निरंतरची ताकीद या प्र.वादी क्र. १ ते ७ विरुध्द देणेकरीता सदर दावा दाखल करणे भाग पडले आहे. वादीच्या दाव्यातील कलम ४ मधील कथने पाहता, वादीच्या कथनाप्रमाणे प्र. वादी क्र. १ ते ७ हे स्तःच्या क्षेत्रात जाणेसाठी व स्वतःचे क्षेत्र वाचविणेसाठी वादींच्या दावा मिळकतीत अतिक्रमण करुन रस्ता निर्माण करु लागले आहेत.

४. सदर दाव्यातील दाव्याची मागणी कलम ११ ब प्रमाणे प्र. वादी क्र. १ ते ७ यांनी वादींच्या दावा मिळकतीमध्ये निर्माण केलेला रस्ता हा बेकायदेशीर आहे व तो काढून घ्यावा व दावा मिळकत ही पूर्ववत करुन दयावी अशी हूकूमी ताकीद या प्रतिवादींना देण्यात यावी अशी मागणी दिसून येते. तसेच वादींची दुसरी मागणी की, प्र. वादी क्र. १ ते ७ यांनी वादींच्या दावा मिळकतीतील शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळ करु नये, करवू नये व रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करु नये अशी निरंतरची ताकीद या प्रतिवादींना देवविणेत यावी अशी मागणी केली आहे.

५. सदर दाव्यातील वादींची दावा कलम ४ व ५ मधील कथने पाहता, प्र. वादी क्र. १ ते ७ हे रस्ता तयार करण्याच्या प्रयत्नात आहेत किंवा प्रतिवादींनी रस्ता तयार केलेला आहे या दोन्ही कथनाबाबत साशकंता निर्माण होते. त्यामुळे वादीच्या कथनांवरुन व मागणी वरुन सदर प्रतिवादी हे दावा मिळकतीतून रस्ता करण्याच्या तयारीत आहेत किंवा किंबहुना तसा रस्ता तयार केला आहे या दोन्ही बाबींमुळे सध्या परिस्थीती काय आहे, हे वादींनी अभिलेखावर आणणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत अर्जामध्ये देखील प्रतिवादी हे वादींना जाणूनबुजून त्रास देण्याच्या उद्धेशाने व सदर दावा मिळकतीतून बळजबरीने रस्ता करण्याच्या उद्धेशाने सदरील कृत्य करीत आहेत व वादींना व घरातील लोकांना दमदाटी व मारहाण करीत आहेत असे कथन

केले आहे. त्यामुळे वादीच्या दाव्यातील विधानांमध्ये, मागणी मध्ये व आज रोजीच्या अर्जातील विधानांमध्ये दावा मिळकतीच्या सध्यपरिस्थीती बाबत संदिग्धता दिसून येते. त्यामुळे सदर दावा मिळकतीची आजरोजीची परिस्थीती नक्की काय आहे, म्हणजेच प्र. वादी क्र. १ ते ७ हे रस्ता तयार करण्याच्या प्रयत्नात आहेत किंवा रस्ता तयार करुन पूर्ण झालेला आहे याबाबत निश्चीतपणे ठाम मत अभिलेखावरील कागदपत्रांवरुन आणि वादीच्या कथनावरुन ठरविता येत नाही.

७. वादींच्या दावा कलम ३ मधील कथनानुसार प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी दावा मिळकत ० हे. ७ आर एवढया क्षेत्रात अतिक्रमण केले असून त्याबाबत वादींनी याच न्यायालयात नियमीत नि.दि.मु.क्र. १६६/२०१४ हा दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ठ आहे. सदर दाव्याची प्रत नि.क्र. १४/१ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा या दाव्यातील वादी क्र.१ आणि वादी क्र.२ चे वडील बाळासाहेब पाटील यांनी प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीत ० हे. ०७ आर मिळकतीत केलेले अतिक्रमण काढून मिळणेकरीता केलेला आहे. यावरुन दावा मिळकतीचा काही भाग प्रतिवादींच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. तसेच नगरपालिका, जत यांच्या पाईपलाईनच्या जागेबाबत नि.दि.मु.क्र. २३२/२०१३ हा प्रलंबीत असून त्यावरील अपील मा.जिल्हा न्यायालय, सांगली यांचेकडे देखील अपील क्र. ६९/२०१४ हे प्रलंबीत आहे. सबब सदर वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सन २०१४ पासून दावा मिळकती बाबत वाद प्रलंबीत असल्याचे दिसून येते. अशा परिस्थीतीमध्ये प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये अतिक्रमीत क्षेत्राच्या ताब्यात असल्याने प्रतिवादींचे म्हणणे मांडण्यास संधी दिल्याशिवाय सध्य स्थीतीत दावा मिळकतीबाबत कोणताही आदेश करणे नैसर्गिक न्याय तत्वास धरुन होणार नाही असे माझे मत आहे.

८. दिनांक १६.६.२०२२ रोजीचा प्रतिवादी क्र. १ ते ९ यांचे विरुध्द समन्स बजाविणे बाबतचा अहवाल पाहिला असता, प्रतिवादी क्र. १ यांचे घरास कुलूप असून ते

दोन दिवसापूर्वी परगावी गेले आहेत, परत कधी येणार आहेत याची माहिती मिळून आली नाही. प्र. वादी क्र. २ हे चिक्कोडी येथे मुलीकडे गेले आहेत, केव्हा परत येणार आहेत याची नक्की माहिती नाही. प्र.वादी क्र. ३ हे त्या दिवशी सकाळी परगावी गेले आहेत. प्रतिवादी क्र. ४ व ६ हे जतमध्ये कोठे राहतात याची माहिती मिळून आली नाही. प्र.वादी क्र. ५ हे कोल्हापूर येथे राहतात व प्रतिवादी क्र. ७ हे सोलापूर येथे कायमपणे राहतात अशी माहिती ग्रामस्थ लोकांनी सांगितली आहे. त्यामुळे प्र. वादी क्र. १ ते ७ यांचे विरुध्द बजावणी झालेली नाही असे दिसून येत आहे. अशा परिस्थीतीत वादीचे नि.क्र.१७ मधील अर्जातील समन्स अहवालाबाबत कथन पाहता, प्रतिवादी हे बेलीफ यांना पाहून घरास कुलूप लावून गेले आहेत व तसा अहवाल देखील न्यायालयात आलेला आहे. परंतु नि.क्र. १५ वरील अहवालाचे अवलोकन केले असता, अहवालातील सर्व माहिती ग्रामस्थ लोकांनी सांगितलेली असून प्र. वादी क्र. १ हे दोन दिवसापूर्वी घरास कुलूप लावून परगावी गेले आहेत असे कारण दिसून येते.

९. वादींचा दावा स्पेसिफीक रिलीफ ॲक्टचे कलम ३९ प्रमाणे हुकमी ताकिदीकरीता असल्याने वादींनी केलेली मागणी ही तयार केलेला रस्ता काढून घ्यावा व दावा मिळकत पूर्ववत करुन दयावी अशी हुकूमी ताकिदीची मागणी असल्याने त्याबाबतचा अंतरिम आदेश हा हुकूमी स्वरुपात असू शकतो म्हणजेच एखादी गोष्ट काढून घेणेबाबत आदेशीत करता येवू शकते. वादींची दाव्यातील कथने व आजच्या अर्जाची मागणी पाहता, हुकमी ताकिदीमध्ये आजची दावा मिळकतीची परिस्थीती अभिलेखावर आले शिवाय आणि प्रतिवादींना समन्स व नोटीस बजावून त्यांचे म्हणणे ऐकल्या शिवाय 'जैसे थे' परिस्थीतीचा हुकूम करता येणार नाही.

१०. अभिलेखावरील कागदपत्रांवरुन व दाखल केलेल्या फोटोग्राफर्स वरुन फोटो क्र. ३/३ व ३/४ वरुन सदर फोटोतील मिळकतीमध्ये तिन इसम खो–याने माती खोदत असल्याचे व खड्डे केल्याचे दिसून येते तसेच फोटो क्र. १९/१ हे पाच महिला व एक मुलगा

असे एका महिलेस उठवण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. फोटो क्र. १९/२ मध्ये तीन लोक खुर्ची टाकून बसलेले असून एक इसम उभा असल्याचे दिसून येते. परंतू वादीच्याच कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ७ हे दावा मिळकतीत अतिक्रमण करुन ० हे. ०७ आर इतक्या क्षेत्राच्या ताब्यात असल्याचे व त्याबाबत जत दिवाणी न्यायालयात नि.दि.मु.क्र. १६६/२०१४ हा प्रलंबीत असल्याने त्याबाबत प्रतिवादींना म्हणणे मांडण्यास संधी दिल्याशिवाय सध्यस्थीतीत कोणताही आदेश करणे योग्य होणार नाही असे माझे मत आहे. अशा परिस्थीतीत वादीची कथने व मागणी पाहता, एकतर्फा 'जैसे थेः चा आदेश करणे न्यायोचित होणार नाही. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

AMARJEET BHARATRAO JADHAV
Digitally signed by AMARJEET BHARATRAO JADHAV
Date: 2022.06.22 17:54:38 +0530

जत. (ए.बी. जाधव)

दिनांक २०.०६.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,जत.

जत.

मी प्रमाणित करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ न्यायनिर्णय मधील मजकूर हा एकसारखा आहे.

स्टेनोग्राफरचे नांव : आय.जी. ऐनापुरे

कोर्टाचे नांव : ए. बी. जाधव,
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग
न्यायदंडाधिकारी जत.

न्यायनिर्णय : दि. २०/०६/२०२२

पिठासीन अधिकारी यांनी
सही केलेली तारीखः : दि. २०/०६/२०२२

न्यायनिर्णय अपलोड केलेली
तारीखः : दि. २२/०६/२०२२